
INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL
ISSN NO : 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651 (UIF)
VOLUME - 13 | ISSUE - 2 | MARCH - 2023

# हिदु कोड बिल आणि सद्याचे महिलांचे कायदाविषयक धोरण

प्रा.विवेक यशवंत धुपदाळे

## १.प्रस्ताविक :




३ ऑगस्ट १९४९ साली पं.जवाहरलाल नेहरूनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना स्वतंत्र भारताच्या मंत्रिमंडळात विधिमंत्री पद दिले. डॉ.आंबेडकरांनी मंत्रिमंडळात जाऊन दलितांचे हित साधता येईल याविचारांने गेले.त्यांना केवळ विरोधाकरीता विराध करणे या तत्वाचा तिरस्कार होता.[1] पण त्यांनी फ क्त दलितांच्यासाठीच केवळ नाही तर राष्ट्रीय पातळीवर पण आपले योगदान दिले.त्यापैकी पहिला टप्पा म्हणजे त्यांनी मांडलेलं हिंदु कोड बिल. त्यांच्या त्या विषमता विरोधी चळवळीमध्ये डॉ.आंबेडकरांनी विरोध करण्याऐवजी ती परिस्थिती सुधारण्याच्या पक्षामध्ये राहण्याचे निवडले. पण त्यांच्या या धोरणांचा विरोध करण्यात आला. त्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकर अतिशय निराश होऊन त्यांनी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला. हा लेख डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेले हिंदु कोड बिल आणि सद्याचे महिलांच्या कायदेविषयक धोरण या विषयावर आधारीत आहे.आणि लेखकांने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे महिला कायदोविषयक धोरणे व त्याआधारे आतापर्यंत झालेल्या कायदयाची निर्मिती यावर थोडक्यात माहीती सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

## २.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे हिंदु स्त्री-पुरूष समानता विषयी राष्ट्रीय योगदानः

भारतीय संविधानाचे जनक व शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्रीयांच्या सामाजिक तसेच व्यापक आणि आर्थिक अधिकारांची प्रखरतेने बाजु मांडली. ते म्हणत असत की स्त्रीयांची सर्वतोपरी प्रगती व्हायला हवी. प्रामुख्याने त्यांनी स्त्रीयांचे सामाजिक शिक्षण, सांस्कृतिक अधिकार, संपत्तीतील समान हक्क त्यांचा मान सन्मान आणि चारित्र्य अबाधित राखण्यावर जोर दिला. त्यांचा पाश्चात्य शिक्षण आणि विचारांमुळे दलित व महिलामुक्ती त्यांच्या विकासासाठी हिंदु समाजाचा दृष्टीकोण बदलण्याचा प्रयत्न केला. अशाप्रकारे डॉ.आंबेडकर हे स्त्रीयांच्या राजकीय चळचवळीचे प्रेरणास्त्रोत राहीलेले आहेत.

स्त्रीला पुर्वीपासून एखाद्या वस्तुचा दर्जा दिला गेला होता. तिला स्वेच्छेने कुठलीही गोष्ट करण्याची परवानगी नव्हती त्यांनी फ क्त चुल व मुल यांसाठीच त्यांचा जन्म असावा अशी विचारसरणी होती.पण डॉ.आंबेडकरांनी आपल्या सामाजिक चळवळीचे योगदान हे दिले की त्यांच्या स्त्रीयांच्या प्रगतीच्या धोरणांच्यासाठी सत्तेपुढे नतमस्तक झाले नाहीत किंवा कोणतीही तडजोड केली नाही याउलट आपल्या कायदेमंत्रि पदाचा राजीनामा दिला. पण आताचे सत्तेत असणारे राजकीय पुढारी अशी तडजोड करतील का ?

[1]डॉ.आंबेडकर बाबासाहेब, २००८, "माझी आत्मकथा "नाग नालंदा प्रकाशन पृष्ठ.क्र.८५

## ३. महिलांचे स्वातंत्र्य व विकास एक ऐतिहासिक दृष्टीकोनः

स्त्रीयांच्या आजच्या समस्या हया मुळात वैदीक काळाच्या आहेत. त्या दिवसात महिलांना अगदी कनिष्ठ स्थान होते. हिंदुच्या धर्मग्रंथामध्ये महिलांच्या बददल अगदी खालच्या दर्जाच्या वागणुकीबददल लिहिलेले आहे.
अनेक असे हिंदु कायदे होते ज्यामध्ये महिलांच्याबददल अतिशय अश्लिल व घाणेरडे उच्चार केलेले आहेत.

महिलांना वेद वाचण्याची परवानगी नव्हती. अशाप्रकारे त्यांचे जीवन एका मर्यादेत चाकोरीत जखडून टाकलेले होते.यामुळे हिंदु समाजातील पुरूष स्त्रीया यांच्या प्रत्येक जीननावश्यक क्षेत्रात कमालीची विषमता निर्माण झाली होती.[२] यापध्दतीमुळे हिंदु स्त्रीयांच्यावर अनेक प्रकारचे अत्याचार होऊ लागले व आजतागायत होत आहेत. तसेच स्त्रीयांच्या बाबतीत वारसा हक्क व विवाह या संबधी अनेक अन्यायमूलक कायदयाची कलमे 'मिताक्षर' व 'दायभाग' या दोन्ही नियमपध्दतीमध्ये आढळून येतात. या सर्व व्यवस्थेमुळे अनेक अडचणी व कटकटी निर्माण झाल्या. त्यात योग्य ती दुरूस्ती व्हावी असे कांही समाजसुधारक व स्त्रीयांच्या संस्थाना वाटु लागले. या कलमांना दुरूस्त्या सुचविणारे अनेक बिले कायदेमंडळात आणली गेली. अशाप्रकारे हिंदु कायदयात सर्व प्रकारची सुधारणा झाली पाहिजे अशी चळवळ सुरू झाली.व त्याबाबत सरकारकडे मागण्याही करण्यात आल्या.यासर्व सूचनांचा विचार करून सरकारने सन १९४१ साली 'दि हिंदुकोड कमिटी' नेमली. सर्व हिंदु कायदयांचे संहितीकरण करून सर्व हिंदुना एकच कायदा लागु करावा व त्यात हिंदु स्त्रीयांना समान हक्क देण्यात यावेत हे या समितीचे प्रमुख काम होते. या कमिटीतर्फे दोन विधेयके सन १९४३ मध्ये मांडण्यात आली. त्या दोन्ही विधेयकावर सनातनी हिंदुनी कडाडून हल्ला केला आणि म्हटले की असले कायदे करून सरकार सनातन हिंदु धर्माचा निपात करीत आहे.[३] शेवटी हिंदु कोडला कायदेशीर भाषेची लेणी लेवविण्याचे प्रमुख काम डॉ.आंबेडकर यांच्याकडे कायदेमंत्रि म्हणून देण्यात आले. अशाप्रकारे हिंदु कोड बिल डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी रात्रंदिवस खुप मेहनत घेऊन तयार केले.

बिलाचा मसुदा तयार झाल्यानंतर लोकसभेसमोर मांडण्याची सम्मती श्री. पं.जवाहरलाल नेहरू आणि इतर पुढाऱ्यांनी दिली. तेव्हा पुन्हा एखदा जीर्णमतवादी सनातन हिंदुनी बिलाविरूध्द जाहीर चळवळ सुरू केली.त्यांनी म्हटले की आंबेडकर हे अस्पृश्य म्हणजे आवर्ण, त्यांच्या हातुन स्मृतिशास्त्रात फेरफार घडवून आणणे म्हणजे केवढा भ्रष्टाकार आणि नरकाचा मार्ग [४] त्यांना असे वाटले की हे बिल पास झाले तर ज्या हिंदु धर्मशास्त्राचे संहितीकरण आतापर्यंत एकाही वर्णश्रेष्ठ हिंदुला करता आले नाही ते एका अस्पृश्य पंडिताने केले तर आपली नामुश्की होणार आहे.या विरोधाचा परिणाम असा झाला की नेहरू मंत्रिमंडळ घाबरले कारण लवकरच सन १९५२ ची निवडणूक होणार होती आणि काँगेस पक्षाला निवडून येण्यासाठी मतदारांच्या जिर्न मतांपुढे मंत्रिमंडळाला झुकावे लागले. पण डॉ.बाबासाहेब आंबेडकर आपल्या मतावर ठाम होते. त्यांनी म्हटले की त्यांनी जसे बिल तयार केलेले होते तसेच ते मंजुर झाले पहिजे. शेवटी पं.नेहरूनी डॉ.आंबेडकरांचे न ऐकता आपल्या काँग्रेस पुढाऱ्यांचा सल्ला स्वीकारून बील मागे घेतले. यावर डॉ.बाबासाहेब आंबेडकर खुप संतापले व आपण एवढी मेहनत घेऊन तयार केलेल्या बिलाचा असा शेवट झालेला पाहून ते निराश झाले आणि त्यांनी आपल्या कायदामंत्रिपदाचा राजीनामा दिला. त्यानंतर हिंदु कोड बिलाचे निरनिराळे भाग करून व त्यात फेरफार करून नविन चार कायदे मंजुर करण्यात आले. ते म्हणजे १.हिंदुविवाह कायदा १९५५ २. हिंदु उत्तराधिकार कायदा १९५६ ३. हिंदु अल्पसंख्याक आणि पालकत्व कायदा १९५६ ४. हिंदु दत्तकग्रहण व निर्वाह कायदा १९५६ .

## ४. भारतीय स्त्रीयांच्या हितरक्षणाच्या हेतूने करण्यात आलेले आतापर्यंतचे कायदे

स्त्रीयांच्या हितरक्षणाच्या हेतूने भारतात करण्यात आलेले कायदे पुढीलप्रमाणे :

१.सतीप्रबंधक कायदा १८२६

२. हिंदू विधवा पुनर्विवाहोत्तेजक कायदा १८५६

३. धर्मांतरीतांचा पुर्वीचा विवाह रदद् करणारा कायदा १८६६

[2] खैरमोडे चांगदेव भवानराव, २००२, "डॉ.आंबेडकर आणि हिंदु कोड बिल" सुगावा प्रकाशन,पुणे पृष्ठ क्र.९

[3] Ibid,पृष्ठ क्र.१०

[4] Ibid,पृष्ठ क्र.११

४ भारतीय तलाककायदा १८६६
५. ख्रिस्ती विवाह कायदा १८७२
६. विवाहीत नारी संपत्ती संरक्षक कायदा १८७४
७. लीगल प्रॅक्टिशनल (वुइमेन्स) ॲक्ट १९२३
८. बालिका विवाह प्रतिबंधक (शारदा) कायदा १९२६
९. हिंदू उत्तराधिकार अधिनियम (संशोधित) कायदा १९२६
१०.पारसी विवाह आणि तलाक कायदा १९३६
११.हिंदू नारी संपत्ती अधिकार कायदा १९३७
१२. प्रसूती अवस्थेत मिळावयाचे हक्क यासंबंधिचा कायदा १९४३
१३. हिंदू विजोड विवाह प्रतिबंधक कायदा १९४६
१४. हिंदू विवाह वैधता कायदा १९४६

**हिंदु कोड बिल दोन मुख्य विषयावर अवलंबुन होते.**

१. हिंदु स्त्रीयांना सन्माननीय स्थान व समान हक्क देण्याबाबत.
२. जाती भेद व विषमता हाणून पाडणेबाबत.

**हिंदू कोड बिल नंतरचे कायदे :**

१. विशेष विवाह कायदा १९५५
२. हिंदू विवाह कायदा १९५६
३. हिंदू उत्तराधिकार कायदा १९५६
४. हिंदू दत्तकग्रहण आणि निर्वाह कायदा १९५६
५. हिंदू दत्तक ग्रहण कायदा १९५८
६. वेश्यावृत्ती उन्मुलन कायदा १९५८
७. हुंडा प्रतिबंध अधिनियम १९६१
८. अनैतिक वाहतूक(प्रतिबंध )अधिनियम १९५६
९. घरगुती हिंसापासून महिलांना संरक्षण कायदा २००५
१०. कामाच्या ठिकाणी होणारे स्त्रीयांचे लैंगिक छळ(प्रतिबंध,मनाई,व निट करणे)अधिनियम २०१३ इ.

**६. भारतीय स्त्रीयांसाठी घटनात्मक आणि कायदेशीर तरतूदी :**

लिंग समानता, मूलभूत अधिकार, मूलभूत कर्तव्य इ. भारतीय संविधानाच्या Preamble मध्ये जतन आहे.भारतीय राजघटना महिलांना समानतेचा हक्क देते त्याचबरोबर राज्यांना आदेश देते की त्यांनी महिलांच्या हितासाठी विशेष तरतूदी कराव्या. भारताने स्त्रीयांच्या समान हक्कसुरक्षित ठेवण्यासाठी विविध आंतराष्ट्रीय नियमावली आणि मानवी अधिकार साधने यांना संम्मती दिली आहे. त्यापैकी एक आहे the Convention on Elimination of all forms of Discrimination Against Women (CEDAW ) ज्याला सन १९९३ मध्ये संम्मती दिली आहे.

## घटनात्मक विशेषाधिकारः

१. स्त्रीयांसाठी कायदयाच्या दृष्टीने एकात्मता [५]

२. राज्यांने कोणत्याही नागरीकाला फक्त धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान यापैकी कोणत्याही कारणाने भेदभाव करू नये.[६]

३. राज्याने स्त्रीयां आणि मुले यांच्या नांवे कोणत्याही विशेष तरतूदी करणे.[७]

४. राज्यअंतर्गत कोणत्याही कार्यालयात रोजगार किंवा नेमणूक संबंधी सर्व नागरीकांना समान संधी.[८]

५. स्त्री आणि पुरूष यांना उदरनिर्वाहांची साधने समानतेचा अधिकार[९]

६. स्त्री पुरूष यांना समान कामा बददूल समान वेतन मिळणे[१०]

७. न्याय प्रोत्साहन आणि न्याय सुरक्षितता संधी व इतर अपंगत्वाचे कारणे व मोफत कायदेशीर मदत पुरवण्यासाठी [११]

८. राज्यांनी अनुकूल योग्य आणि माणुसकीच्या दृष्टीकोणातून कामावर सुरक्षित परिस्थिती आणि प्रसूती सवलत देण्याची तरतूद करणे.[१२]

९. राज्यांने कमकुवत विभागांची शैक्षणिक आणि अर्थिक प्रोत्साहन आणि सर्वप्रकारच्या सामाजिक शोषण व अन्याय विरूध्द संरक्षण देणे.[१३]

११. राज्यांने पोषन पातळी आणि लोकांचे जीवनमान वाढविण्याचा प्रयत्न करणे.[१४]

१२. सर्व लोकांमध्ये सुसंवाद साधण्यास प्रोत्साहित करणे व एकता निर्माण करणे आणि स्त्रीयांच्या विरूध्द नशोभणाऱ्या पध्दतीस आळा घालणे.[१५]

१३. महिलांच्यासाठी प्रत्येक पंचायत थेट पोटनिवडणूकीमध्ये (अनुसूचित जाती आणि जमाति महिलांसाठी राखीव जागेसह) १/३ पेक्षा कमी नसून विविध मतदारसंघामध्ये रोटेशन करून देण्यात येणारी जागा.[१६]

१४. प्रत्येक पंचायतमध्ये स्त्रीयांसाठी चेअरपर्सनपदी किमान १/३ पेक्षा जागा देणे.[१७]

१५. महिलांच्यासाठी प्रत्येक नगरपालिका थेट पोटनिवडणूकीमध्ये (अनुसूचित जाती आणि जमाति महिलांसाठी राखीव जागेसह) १/३ पेक्षा कमी नसून विविध मतदारसंघामध्ये रोटेशन करून देण्यात येणारी जागा.[१८]

## स्त्रीयांसंबंधी इतर कायदेशीर तरतूदी :

स्त्रीयांना समान अधिकार याची खात्री देण्यासाठी व समाजिक भेदभाव व हिंसा टाळण्यासाठी भारत सरकारने विविध कायदे नमूद केले आहेत. हया कायदयांचे दोन श्रेणीमध्ये वर्गीकरण केले आहे.

---

[5]अनुच्छेद १४

[6]अनुच्छेद १५(1)

[7]अनुच्छेद १५( 3 )

[8]अनुच्छेद १६

[9]अनुच्छेद ३९ ( 1 )

[10]अनुच्छेद ३९ ( 4 )

[11]अनुच्छेद ३९ (अ )

[12]अनुच्छेद ४२

[13]अनुच्छेद ४६

[14]अनुच्छेद ४७

[15]अनुच्छेद ५१अ (e)

[16]अनुच्छेद २४३D (3)

[17]अनुच्छेद २४३D (4)

[18]अनुच्छेद २४३D (3)

[17]अनुच्छेद २४३D (4)

**१. भारतीय दंड संहितेच्या अंतर्गत गुन्हे (IPC)**

अ. बलात्कार [१९]

ब. विविध कारणांसाठी केले जाणारे अपहरण [२०]

क. हुंडाबळी किंवा त्याचा प्रयत्न[२१]

ड. मानसिक व शारीरीक यातना[२२]

इ. त्रास (Molestation)[२३]

उ. लैगिक छळ[२४]

**२. विशेष कायदे अंतर्गत गुन्हे.**

सर्वच कायदे लिंग विशिष्ट नाहीत,तरी महिला हिताबददूल तरतूदी अनेक कायदयामध्ये करण्याचा नियमितपणे आढावा आतापर्यंत घेतलेला आहे.

७. भारतामधील होणारे बलात्कार,लैंगिक छळ, आणि इतर छळवणूक व अत्याचार याबददूल २०१४ पर्यंतचा सांखेतिक आढावाः

भारतामध्ये महिला विरूध्द बलात्कार,लैंगिक छळ, आणि इतर छळवणूक व अत्याचार हे गुन्हे सद्या दुर्दैवाने सर्वसामान्य घटना बनत आहेत.कित्येकवेळा या गुन्हयांची तक्रार आब्रु जाण्याच्या भितीने किंवा तक्रार केल्याने गुन्हेगार सूड घेतील या भितीने केली जात नाही.१६ डिसेंबर २०१२ मध्ये अशीच एक दुर्देवी गोष्ट घडली ती म्हणजे एक २३ वर्षीय तरूण मुलीला अतिशय निर्दयपणे मारहाण करून तिच्यावर सामुहिक बलात्कार आपल्या भारतीय राजधानीमध्ये करण्यात आला. या गोष्टीमुळे त्या मुलीला प्राणास मुकावे लागले.

१. बलात्कार विषयी सांकेतिक आढावा[२५]:

अ. महिला विरूध्द लैंगिक छळांचे प्रकार (2007 -2012)

१. Molestation (त्रास)

२. Rape (बलात्कार)

३. Sexual harassment (लैंगिक छळवणुक)

ब. बलात्कार गुन्हयाबददूल फक्त २४ % गुन्हेगारांचा अपराध सिध्द झाला आहे.

क. ३७% स्त्रीयांच्यावर त्यांच्या पतीने आत्याचार केले जात आहे.

ड. महिला विरूध्द शारीरीक छळवणूक यातील प्रकार (2007 - 2012)

१. पतीने किंवा नातेवाईकानी केलेला छळ

२. अपहरण

३. हुंडाबळी

इ. पिडीत महिला व बलात्कारी यांच्यातील नाते.(2012)

१. पालक किंवा जवळचा नातेवाईक २%

---

[19]Sec-376 IPC
[20]Sec-363 -373 IPC
[21]Sec-302/304-B IPC
[22]Sec-498-AIPC
[23]Sec-354-IPC
[24]Sec-509 IPC
[25]http://en.wikipedia.org/wiki/Rape_statistics

२. इतर नातेवाईक ६%
३. शेजारी ३५%
४. इतर ओळखीची व्यक्ती ५७%
ई. जास्त बलात्कार झालेल्या शहरांची संख्या (2012)[26]
१. विजयवाडा १८९८ सादर केलेले बलात्कारी गुन्हे.
२. हैद्रबाद १८९९ सादर केलेले बलात्कारी गुन्हे.
३. कोलकाता २०७३सादर केलेले बलात्कारी गुन्हे.
४. बेंगलोर २२६३ सादर केलेले बलात्कारी गुन्हे
५. दिल्ली ५१९४ सादर केलेले बलात्कारी गुन्हे.
उ. २२ जानेवारी २०१४ पर्यंत मिळालेल्या माहितीनूसार प्रत्येक २२ मिनिटाला भारतामध्ये किमान एका महिलेवर बलात्कार होतो.
ऊ. धक्कादायक गोष्ट म्हणजे बलात्कार पिडीत महिलांपैकी ९८ % महिला आपल्या बलात्कारींना ओळखतात.
वरील सांख्यिकी अहवालानूसार असे दिसून येते की हा गुन्हा सर्वात जास्त दिल्ली या शहरामध्ये झालेला असून त्याची टक्केवारी पाहीली असता दिनांक २२ जानेवारी २०१४ पर्यंत १४.१८% टक्के आहे.

२. कौटुंबिक छळवणूक विषयी सांकेतिक आढावा[२७]
अ. ३७% महिलांची छळवणूक ही त्यांच्या पतीकडून होत आहे.
ब. राष्ट्रिय कुटुंब स्वास्थ सर्वेक्षण (National Family Health Survey) यांच्यानूसार ५१% भारतीय पुरूष व ५४% भारतीय महिला यांच्या मतानूसार पतीने आपल्या पत्नीवर अन्याय केला तर चालतो असे समर्थन दाखविले आहे.
क. UNICEF च्या सर्वेक्षणानूसार ५२ % तरूण मुली आणि ५७% तरूण मुलांच्या मते दाम्पत्यांमध्ये भांडणे होणे सहाजिकच आहे असे समर्थन दिले.
ड. २०१० ते २०११ दरम्यान महिला विरूध्द गुन्हयांच्या संखेत ७ % नी वाढ झालेली आहे.

## निष्कर्षः

स्त्रीयांच्या सदयाचे समस्यांचे कारण म्हणजे अजुन सुध्दा भारतामध्ये हिंदू धर्मग्रंथांच्या म्हणजे वैदीक, पुराणिक,मनुस्मृती भगवतगीता, रामचरिता मानस, इ. यामध्ये स्त्रीयांना कनिष्ट दर्जा दिल्यामुळे हिंदू लोकांची मानसिकता अजुनही तशीच आहेत. ती बदलण्याची सद्याची गरज आहे.सिध्दार्थ गौतम बुध्द म्हणतात की सर्व वाईट गोष्टींचे मूळ मन आहे. जर आपण मन परीवर्तन करू तर वाईट गोष्टींना त्यामनामध्ये जागा मिळेल का? भारतीय राज्यघटनेने जरी या धर्मग्रंथांची जागा घेतली असली तरी हिंदू लोकांची मने अजुनही जुन्या रूढी व परंपरामध्येच गुंतलेली आहेत.जरी आपल्या भारतीय संविधानामध्ये स्त्रीयांना कायदेशीर समान हक्क व संरक्षणाची तरतूदी असल्या तरी, अजुनही त्यांचे शोषण चालूच आहे.जर या समस्येचे कायमचे निवारण करायचे असेल तर आपल्या जुन्या रूढी व परंपरांना आळा घातला पाहिजे, लोकांची मने परीवर्तीत झाली पाहिजे.आपण जगाबरोबर चालले पाहिजे.

स्वामी विवकानंद म्हणतात की जोपर्यंत महिलांच हित शक्य होत नाही तोपर्यंत या जगाच कल्याण होन अशक्य आहे. एका पक्ष्याला एकाच पंखावर भरारी घेणे शक्य नाही. म्हणून मनुष्य जरी विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रामध्ये प्रगती करत असला तरी स्त्रीयांच्या समस्यांच्या बाबतीत अजुनही मागासलेला आहे. शेवटी आपण स्वामी विवेकानंदांच्या शब्दामध्ये असे म्हणू शकतो की महिला राजकारणांमध्ये देश चालविण्यामध्ये आणि लढायांमध्ये भाग घेऊन हे सिध्द केलेले आहे की पुरूषांच्या बरोबरीने आपणही काम करू शकतो.

---

[26]Statistics published by National Crime Records Bureau in India (NCRB).
[27]Ibid.

## संदर्भः


1. Dr. Ambedkar B.R., 2004, *Hindu Sthriyanchi Unnati aani Avanati*, Sugat Prakashan, Nagpur.
2. Dr. Ambedkar Babasaheb, 2008, *Maajhi Atmakatha*, Naag Nalanda Prakashan, Sangli.
3. Bakshi P.M., 1999, *The Constitution of India,* Universal Law Publishing Co. Pvt. Ltd., Delhi.
4. Basrur M. Rajesh, 2009, *Challenges to Democracy in India*, Orford University Press, New Delhi.
5. Dr. Chandel Dharmaveer, 2011, *Manavaadhikaar Nehru Aur Ambedkar*, Pointer Publishers, Jaipure.
6. Indian Human Rights Law Review, Vol.1, No.1, June-2010 issue, R. Cambray & Co. Pvt. Ltd., Kollkatta.
7. Kalakar S.J., 2007, *Aadhaar Arthaat Lokashahi Nako Lokarajyach have*, Satyabhama Prakashan, Kagal.
8. Kashyap Subhash, 2008, *Our Parliament*, National Book Trust India, New Delhi.
9 Khairmode Changdev Bhavanrao, 2002, *Doctor Ambedkar aani Hindu Code Bill*, Sugav Prakashan, Pune.
10. Dr. Mane Suresh, 2007, *Indian Constitutional Law, Dynamics and Challenges*, Aarti & Co., Mumbai.
11. Prof. Misra S. N., 2006, *Indian Penal Code*, Central Law Publication, $14^{th}$ Ed., Allahabad.
12. Mungudkar M. P., 1968, *Bharatiya Lokshahi Kahi Veechar*, Nagpur Prakashan, Nagpur.
13. Pandey J.N., 2000, *Constitutional Law of India*, Central Law Agency, Allahabad.
14. Prof. Paranjape N. V., 2006, *Criminology and Penology*, Central Law Publications, Allahabad.
15. Rajak Brajesh, 2011, *Pornography Law*, Universal Law Publishing Co. Pvt. Ltd., New Delhi.
16. Singh Mahendra P., *Constitution of India*, 2000, Eastern Book Company, Lucknow.
17. Yaji Raman B.S., 2005, *Constitutional Law and Professional Ethics*, United Publishers, Mangalore.